# डॉ. एल. डी. बलखंडे कॉलेज ऑफ आर्टस् अॅण्ड कॉमर्स, पवनी जि. भंडारा

## ऑनलाईन स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन कार्यशाळा

## MPSC/UPSC

दिनांक :– १३ मे २०२१

वेळ सकाळी १०.०० वाजता

## कार्यक्रमाची रूपरेषा

| | |
|---|---|
| कार्यक्रमाचे अध्यक्ष | :– मा. प्रा. संजय नंदागवळी, कार्यकारी प्राचार्य |
| प्रमुख अतिथी व मार्गदर्शक | :– मा. अनिल साहेबराव मस्सकोल्हे, ज्ञानसंदेश करीअर अकॅडमी, विरली तह. पवनी जि. भंडारा |
| | :– मा. चांदणी उध्दव पडोळे, विरली तह. पवनी जि. भंडारा (UPSC २०१७ मध्ये पूर्व परीक्षा पास) |
| प्रास्ताविक | :– प्रा. नंदकिशोर सिंगाडे, उपप्राचार्य |
| संचालन | :– प्रा. विलास मेश्राम |
| आभार | :– विशाल नंदापुरे |

टिप– १) उपरोक्त कार्यक्रम ऑनलाईन **Google meet** या आभासी ( **Virtual**) मंचावर घेण्यात येईल.

२) कार्यक्रमाच्या नियोजित वेळेच्या १५ मिनिटे आधी लॉग–इन करावे.

Link :- https://meet.google.com/ohd-ecru-ceq

Scanned by CamScanner




Scanned by CamScanner

Pravarsen Shikshan Santha Nagpur's
**Dr.L.D. Balkhande College of Arts & Commerce**
( Old Name: P.S.S. College) Pauni-441910,Dist- Bhandara
NAAC Accrediation ' C ' Grade
E-mail ID :- pss_pauni@rediffmail.com/drldbalkhandecoaac@gmail.com Phone 07185-255490
Website:- www.dldbcollegepauni.org

•President•
Dr. Deepa M. Balkhande

•Secretary•
Mr. Milind L. Balkhande

•Officiating Principal•
Mr. Sanjay M. Nandagawali

Ref. No:-____________ Date :-____________

# अहवाल

## डॉ. एल. डी. बलखंडे कॉलेज ऑफ आर्ट्स अॅण्ड कॉमर्स, पवनी ऑनलाईन स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन कार्यशाळा संपन्न

डॉ. एल. डी. बलखंडे कॉलेज ऑफ आर्ट्स अॅण्ड कॉमर्स, पवनी येथे दि. १३/०५/२०२१ ला ऑनलाईन स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन कार्यशाळचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेचे अध्यक्ष मा. प्रा. संजय नंदागवळी, कार्यकारी प्राचार्य तसेच प्रमुख अतिथी व मार्गदर्शक मा. अनिल मरसकोल्हे,संचालक ज्ञानसंदेश करियर अकॅडमी विरली, ता. पवनी जि. भंडारा, दुसरे मार्गदर्शक मा. कु. चांदणी पडोळे, आसगांव ता. पवनी जि. भंडारा हे होते. प्रमुख उपस्थितीमध्ये मा. प्रा. नंदकिशोर सिंगाडे, उपप्राचार्य, यांच्या उपस्थितीत या कार्यशाहेचे आयोजन करण्यात आले.

ऑनलाईन स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन कार्यशाळेचे अध्यक्ष मा. प्रा. संजय नंदागवळी, कार्यकारी प्राचार्य, यांनी अध्यक्षिय मनोगतातून सांगितले की, आजचे युग स्पर्धेचे आहे. आज महाविद्यालयातीन विद्यार्थी मोठया प्रमाणात सामान्य क्षेत्राकडे वळतांना दिसतात. पण विद्यार्थ्यांनी कठोर परिश्रम करून स्पर्धा परीक्षेच्या माध्यमातून मोठया पदाच्या नोक—या प्राप्त करता येतात असे मत व्यक्त केले. या कार्यशाळेचे प्रमुख मार्गदर्शक मा. अनिल मरसकोल्हे, यांनी मार्गदर्शनातून कला शाखेचे महत्व पटवून दिले. विद्यार्थ्यांनी स्वत:शीच स्पर्धा करावी. कठीण परीश्रम करून विद्यार्थ्यांनी Smart बणण्याचे प्रयत्न करवे व नियमित वर्तमान पत्राचे वाचन करून त्यातील संपादकिय लेख आवर्जुन वाचावे. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या ज्ञानाच्या कक्षा रूंदावतात व विद्यार्थी स्पर्धा परीक्षेत यश संपादन करू शकतात असे मत व्यक्त केल. या कार्यशाळेचे दुसरे प्रमुख मार्गदर्शक मा. कु. चांदणी उध्दव पडोळे, यांनी मनोगतातून सांगितले की, UPSC परीक्षेला बसलेल्या १०० विद्यार्थ्यांपैकी १०% असे विद्यार्थी असतात की ते पुर्ण तयारी करून परीक्षेला बसतात. यांनी UPSC अभ्यासक्रमाविषयी सविस्तर माहिती दिली शहरी भागापेक्षा ग्रामीण भागातील मुलेच मोठया प्रमाणात ही परीक्षा यशस्वी होतात. ग्रामीण भागातील मुले कुठल्याच संकटांना घाबरत नाही. विद्यार्थ्यांनी स्पर्धा परीक्षेच्या माध्यमातून स्वत:चे भविष्य निर्माण करावे असे मत व्यक्त केले. या कार्यशाळेचे प्रास्ताविक मा. प्रा. नंदकिशोर सिंगाडे यांनी मनोगतातून सांगितले की,दिर्घ व सतत प्रयत्न केल्याने यशाचे शिखर गाठता येते. या कायशाळेचे संचालन प्रा. विलास मेश्राम यांनी तर आभार विशाल नंदापुरे, बी. ए. भाग १ यांने मानले. या कार्यशाळेला महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक वृंद व महाविद्यालयाचे विद्यार्थी मोठया प्रमाणात ऑनलाईन उपस्थित होते.

Officiating Principal
Dr. L.D. Balkhande
College of Arts and Comm
Pauni. Dist. Bhandara

Scanned by CamScanner